**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.०७/०९/२०१९**
**दि.०६/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे १६६/१९,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | अमित कार्डीले, वय ४० वर्षे,रा.बिबवेवाडी-कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०९/२०१९ रोजी १२/०० वा.ते १२/४५ वा.चे दरम्यान धवलगिरी सोसायटी, बिबवेवाडी कोंढवा रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरुम मधील कपाटातील सोन्याचे दागिने एकुण १४ लाख ४० हजार रु. किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.ए. खटके ९५५२७२१७२१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३०८/१९,भादविक ४९८(अ),३०४(ब),३०६,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,,वय ४९ वर्षे, रा.हडपसर, पुणे |
| **आरोपी** | १)वसीम रफिक शेख वय ३४ वर्षे, २)अस्लम फकीर शेख वय ६० वर्षे, व इतर तीन सर्व रा.कसाई मोहल्ला खडकी पुणे (अ.क्र.१ व २ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१९ पासून दि.०६/०९/२०१९ रोजी पर्यंत वेळोवेळी तिचे सासरी राहते घरी कसाई मोहल्ला खडकी बाजार, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी नामे सौ.सानिया वसीम शेख,वय २४ वर्षे, ही दि१९/१०/१९ रोजी तिचे लग्नापासून तिचे सासरी कसाई मोहल्ला खडकी पुणे येथे तिचे पती वसीम रफिक शेख, वय ३४ वर्षे, तिची मुलगी वय ४ वर्षे, सासु,ननंद,चुलत सासरा, चुलत सासू,चुलत सासु यांचा मुलगा व मुलगी आते सासु यांचे सोबत राहणेस असून तिस छोटया मोठया कारणावरुन त्रास देवुन, शिवीगाळ करुन, तिचे चारित्र्यावर संशय घेवून तिचा शारीरिक व मानसिक छळ करुन, त्या त्रासला कंटाळून तिने दि.०६/०९/२०१९ रोजी सकाळी ०७/५३ वा.चे सुमारास गळफास घेवून, तिस आत्महत्या करणेस प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ठाकुर ८४२४८५२७७४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २७१/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | वैष्णवी दंडगव्हाळ, वय १८ वर्षे,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०९/२०१९ रोजी दु.१२/२५ वा.चे सुमारास सेंट्रल मॉल जंक्शन जवळ, सार्वजनिक रोडवर, एंरडवणा,पुणे |

**तपशिल** यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी व त्यांची मैत्रिण नेहा सुर्यकांत हबिवंत, वय १७ वर्षे,रा.घोरपडे पेठ,पुणे असे पायी जात असताना, ट्रक चालकाने नेहा हबिवंत हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,तिचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला.

**त.अंमलदार** सहा.पो.फौज. एस.ए.मेमाने ९९२३२२५१५७

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडक पो स्टे ३४७/१९,भादविक ४२०, ३४

**फिर्यादी** एक पुरुष, वय ५८ वर्षे, रा. वर्षा निवास, गारमाळ, धायरी फाटा, सणस शाळेच्या पाठीमागे, पुणे.

**आरोपी** दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०९/२०१९ रोजी सायंकाळी ०५/१० वा. चे सुमारास सेव्हन लव्हज चौक, चंदन हॉटेल चे उत्तरेकडील बाजूस स्वारगेटकडे जाणारे शंकरशेठ रस्त्याचे लगत एका हार विक्रीचे दुकानासमोर, पुणे येथे

**तपशिल** वर नमूद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांनी त्यांची कार पार्क करुन गाडीतून खाली उतरुन त्यांचे डावे हातातील तर्जनी, मध्यमा व करंगळी मधील तिन सोन्याच्या अंगठ्या ह्या सैल झाल्या सारख्या वाटलेने त्या कोठेतरी पडून गहाळ होवू नयेत म्हणून त्या बोटामधून काढून पॅन्टचे खिशामधून रुमाल काढून त्या रुमालामध्ये गुंडाळून पुन्हा पॅन्टच्या खिशामध्ये ठेवल्या असता तसेच खिशामधील १० हजार ५००/-रु. रोख रक्कम असे एकुण ३० हजार ५००/- रु. किं.चा ऐवज एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे जवळ येवून व त्याने फिर्यादी यांना काय काका? मला ओळखत नाही का?, असे म्हणून फिर्यादी यांना मिठी मारुन, फिर्यादी व त्याची ओळख आहे असा बाहाणा करुन फिर्यादीचे ऊजवे पायास हात लावून पॅन्टचे खिशामधून तीन अंगठ्या व रोख रक्कम काढून घेवून स्वारगेटकडे जाणारे एका अनोळखी दुचाकी स्वाराचे पाठीमागे बसून निघून गेला म्हणून एक अनोळखी इसमाने तसेच एका दुचाकी अनोळखी दुचाकी स्वाराने फिर्यादी यांची फसवणूक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. जी.बी.माने ९६८९७६८३२२

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ७५४/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला, वय २८ वर्षे,रा.कोंढवा बु//,पुणे

**आरोपी** अनोळखी मोबाईल धारक

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२५/०७/२०१९ रोजी ते दि.१४/०८/२०१९ रोजी सकाळी १०/०० वा.ते दु.१२/०० वा.चे दरम्यान टिळेकर नगर, व उंड्री कोंढवा,पुणे

**तपशिल** वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांनी ओएलक्स या ॲपवर घरातील जुना डायनिंग टेबल विकण्याकरीता टाकला होता.अनोळखी मोबाईल धारकाने तो विकत घेण्याचा बहाणा करुन,फिर्यादी यांना एक फसवणूक करणारी बनावट लिंक पाठवून लिंकवर क्लिक करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांचे बँक खात्यामधुन ६५ हजार रु. काढुन फसवणूक केली आहे. तसेच एक महिला रा.उंड्री,पुणे यांनी ओएलक्स ॲपवर फर्निचर विक्रीची ॲडव्हटाईज देवून त्यांना अनोळखी मोबाईल धारकाने फर्निचर खरेदी करण्याचा बहाण करुन, बनावट लिंक पाठवून, क्लिक करण्यास भाग पाडुन त्यांचे बँक खात्यातुन ९९ हजार ९९९/- रु. काढुन असे दोघींचे मिळुन एकुण १ लाख ६४ हजार ९९९/- रु. काढुन घेवुन फसवणूक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) महादेव कुंभार ८१०८००५५३७

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे ९००/१९,भादविक ३५३,३२३,५०४ व मुंबई प्रोव्हिबिशन ॲक्ट ८५

**फिर्यादी** सी.एस.सुलाखे,पो.ना. हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर

| | |
|---|---|
| **आरोपी** | गणेश यादगिरी भिमनाथ, वय ३४ वर्षे,रा.सर्व्हे नं.३०५८ आयबीएम सासवड रोड तुकाईदर्शन फुरसुंगी पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०९/१९ रोजी रात्री २३/३० वा चे सुमारास सर्व्हे नं.३०५८ आय बी एम सासवड रोड तुकाईदर्शन फुरसुंगी पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळ व ठिकाणी, यातील फिर्यादी व त्यांचे सहकारी पो.शि.रशिद शेख यांचेसह फुरसुंगी मार्शल ड्युटी कर्तव्य बजावित असताना, यातील इसम गणेश यादगिरी भिमनाथ याचे विरुध्द त्याची पत्नी नामे सौ.सपना गणेश भिमनाथ हिने भादंविक ३२३,५०४ प्रमाणे दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस हवालदार जाधव यांचे आदेशावरुन सदर इसमास समज देण्यासाठी पो.शि.रशिद शेख गेले असता, नमुद इसमाने मद्यार्काचे सेवन केलेले अवस्थेत आरेराई करुन,फिर्यादी हे कायदेशीररित्या सांगुनही त्याने आदेश न मानता आराडा ओरडा करुन, अपशब्द बोलुन, धक्का-बुक्की करुन, सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गाडे ८८८८८७९९६९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**